# M/P ENT – 21

Total No. of Pages : 12

| Seat No. | |
|---|---|

# M.Phil / Ph.D. Entrance Examination, September - 2022
## MARATHI
## Sub. Code : 58767

**Day and Date : Thursday, 22 - 09 - 2022** **Total Marks : 100**

**Time : 04.00 p.m. to 06.00 p.m.**

**Instructions :**
1) All questions are compulsory.
2) Each question carries 2 marks.
3) Answers should be marked in the given OMR answer sheet by darkening the appropriate option.
4) Use black ball point pen only for marking the circle. Do not make any stray mark on the OMR Answer Sheet.
5) Follow the instructions given on OMR Sheet.
6) Rough work shall be done on the sheet provided at the end of question paper.
7) Only non-programmable calculators are allowed.

पुढीलपैकी योग्य ते पर्याय निवडा.

**1)** व्यक्तिगत मुलाखती, चाचण्या, प्रश्नावली, पॅनेल गट या द्वारे संशोधन कोणत्या पद्धतीत केले जाते?

अ) साहित्याचे संशोधन      ब) सामाजिक संशोधन

क) ऐतिहासिक संशोधन      ड) सर्वेक्षण पद्धती

**2)** भाषा ही एक चिन्हव्यवस्था असून 'चिन्हक' आणि 'चिन्हित' या दोन पैलूंनी ती बनलेली असते हे विधान कोणत्या भाषातज्ज्ञाचे आहे?

अ) चॉम्स्की      ब) चार्ल्स बॅरी

क) कार्ल व्होसलर      ड) सोस्युर

**3)** जुन्या संहितांचा अर्थ लावणे, पाठभेद शोधणे हे कोणत्या अभ्यासशाखेचे काम आहे?

अ) इतिहासाचे      ब) पुरातत्वशास्त्राचे

क) पाठचिकित्साशास्त्राचे      ड) साहित्य संशोधनाचे

*P.T.O.*

4) 'साहित्य संशोधन वाटा आणि वळणे' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) वसंत जोशी    ब) रमेश वरखेडे

क) दु. का. संत    ड) सुधाकर शेलार

5) 'जिज्ञासावृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची; अथवा तथ्यनिर्णय करण्याची जी प्रक्रिया, तिला संशोधन म्हणता येईल' ही संशोधनाची व्याख्या कोणी केली आहे?

अ) सदा कऱ्हाडे    ब) उषा देशमुख

क) सु. रा. चुनेकर    ड) व. दि. कुलकर्णी

6) भूतकालीन घटनांचा शोध, नोंदी, विश्लेषण, अर्थानिर्वचन कोणत्या संशोधन पद्धतीत होते?

अ) ऐतिहासिक संशोधन    ब) तौलनिक संशोधन

क) प्रायोगिक संशोधन    ड) सामाजिक संशोधन

7) प्रायोगिक संशोधन पद्धती ही पद्धत कोणत्या काळाशी संबंधित आहे?

अ) ऐतिहासिक    ब) वर्तमानकालीन

क) भविष्यकाळाशी    ड) यापैकी नाही

8) 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ऐतिहासिक संशोधनाचा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) हिपोलीन लेन    ब) जवाहरलाल नेहरू

क) सरदार पटेल    ड) विल्यम जोन्स

**9)** ताम्रपट, दानपत्रे, राजाज्ञा, शिलालेख हे ऐतिहासिक संशोधनाचे कोणत्या प्रकारचे स्त्रोत आहेत?

अ) दुय्यम
ब) ऐतिहासिक
क) प्राथमिक
ड) तौलनिक अभ्यासाचे

**10)** समस्या निश्चिती, माहितीची जमवाजमव, माहितीची चिकित्सा, माहितीचे अर्थनिर्वचन, संशोधनाचा अहवाल लेखन या कोणत्या पद्धतीच्या संशोधनाच्या पायऱ्या आहेत?

अ) वर्णनात्मक
ब) तौलनिक
क) सर्वेक्षण संशोधन
ड) ऐतिहासिक

**11)** 'आपल्या लिखानाला एखाद्या व्यासंगी व्यक्तीचा पाठींबा मिळवण्यासाठी तळटीपा दिल्या जातात.' असे कोणी म्हटले आहे?

अ) हॉकेट
ब) लुईस गॉस
क) जॉन ड्युई
ड) मार्टिन ल्युथर

**12)** सर्वेक्षण पद्धती, व्यष्टी अभ्यास, कारणात्मक तुलनात्मक पद्धती, सहसंबधात्मक पद्धती, अन्वयपद्धती हे कोणत्या संशोधन पद्धतीचे उपप्रकार आहेत?

अ) ऐतिहासिक
ब) सर्वेक्षण
क) तौलनिक
ड) वर्णनात्मक

**13)** नमुना/न्यादर्श निवडणे हे कोणत्या संशोधन पद्धतीत महत्त्वाचे आहे?

अ) सर्वेक्षण
ब) ऐतिहासिक
क) तौलनिक
ड) पाठ्चिकित्सा

**14)** वैज्ञानिक संशोधनामध्ये कोणत्या वास्तवाचा आधार घेतला जातो?

अ) कल्पित

ब) अभौतिक

क) भौतिक

ड) प्रत्यक्ष

**15)** संशोधनाच्या पाच पायऱ्या कोणत्या संशोधकाने सांगितल्या आहे?

अ) जॉन ड्युई

ब) शोपेन हावर

क) ॲरीस्टॉटल

ड) ग्रीअर्सन

**16)** लोकसाहित्याचे संशोधन हे कोणत्या प्रकारचे संशोधन आहे?

अ) ऐतिहासिक

ब) क्षेत्रीय

क) प्रायोगिक

ड) संहिता संपादन

**17)** दोन अध्यापन पद्धतीच्या यशाची व अपयशाची कारणे शोधण्यासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा उपयोग करता येईल?

अ) सर्वेक्षण

ब) प्रायोगिक

क) सहसंबंध

ड) तुलनात्मक कार्यकारण

**18)** भाषा, बोली, लोकसाहित्य हे कोणत्या संशोधनाचा विषय आहेत?

अ) क्षेत्रीय

ब) ग्रंथालयीन

क) प्रयोग

ड) प्रकल्प

**19)** 'विश्वाच्या केंद्रस्थानी पृथ्वी नसून सूर्य आहे आणि पृथ्वी व इतर ग्रह सुर्याभोवती फिरतात', अशी मांडणी कोणी केली?

अ) गॅलेलिओ

ब) रेने देकार्त

क) व्होल्टेअर

ड) कोपर्निकस

**20)** 'घटितार्थशास्त्रा'च्या आधारे कवितेच्या अस्तित्वाचे दोन ध्रुव कोणी मांडले आहेत?

अ) गंगाधर पाटील

ब) म. सु. पाटील

क) सुधीर रसाळ

ड) रा. भा. पाटणकर

**21)** 'गंगराये सुत्ताले करवियले' ही शिलालेखाची ओळ कोणत्या ठिकाणी आहे?

अ) अक्षी

ब) मंगळवेढा

क) श्रवणबेळगोळ

ड) म्हैसूर

**22)** 'नॅशनल मॅन्युस्क्रिप्ट मिशन, दिल्ली' ही संस्था कोणत्या क्षेत्रात काम करते?

अ) हस्तलिखितांचे संशोधन

ब) इतिहास संशोधन

क) प्रादेशिक संशोधन

ड) राजकीय संशोधन

**23)** युरोपातल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे जे मन्वंतर झाले त्याला कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ) वसाहतवाद

ब) आधुनिकतावाद

क) पुनरुज्जीवन

ड) उत्तर आधुनिकतावाद

24) 'सौंदर्य किंवा कलामूल्य स्वायत्त आहेत'. आणि 'सौंदर्य आणि कला ह्या गोष्टी लौकिक जीवनाचे पोषण करतात'. ही विधाने खालीलपैकी कोणत्या संज्ञांना रा. भा. पाटणकरांनी वापरली आहेत?

अ) रुपवाद व आकृतिवाद
ब) कलावाद व जीवनवाद
क) अलौकिकतावाद व लौकिकतावाद
ड) स्वायत्ततावाद व जीवनवाद

25) तत्त्वज्ञानाला आधुनिक वळण देणारा तत्त्वज्ञ कोणाला म्हटले जाते?

अ) मॉन्टेस्क्यू
ब) रेने देकार्त
क) रुसो
ड) मार्क्स

26) तत्, अहम आणि अत्यहम या मनाच्या तीन शक्ती असतात, असे कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मानवी अंतर्मनाची रचना उलगडून दाखवली आहे?

अ) सिग्मंड फ्राइड
ब) युंग
क) कार्ल मार्क्स
ड) रुसो

27) आधुनिक भाषाविज्ञान आणि काव्यशास्त्र यांचा संदर्भ भाषा अभ्यासाच्या कोणत्या शाखेच्या संदर्भाने येतो?

अ) भाषाशास्त्रीय शैलीविज्ञान
ब) बोली विज्ञान
क) प्राग संप्रदाय
ड) चिन्हमिमांसा

28) 'पद्धतिशास्त्रानुसार लिहिलेला वैचारिक निबंध, सूक्ष्मचिकित्सा आणि संतुलित निष्कर्ष' हे कोणत्या निबंधाचे वैशिष्ट्ये आहेत?

अ) शोधनिबंध
ब) व्याप्ती लेख
क) लघुनिबंध
ड) प्रबंध

**29)** 'आपल्या निसर्गविषयक आकलनावर, पर्यावरणाच्या सांस्कृतिक रचनांवर साहित्याचा निश्चित प्रभाव पडत आलेला आहे' हे विधान कोणत्या सामिक्षेविषयी आहे?

अ) अधिवासशास्त्रीय समीक्षा
ब) निसर्गवाद
क) पर्यावरणसमीक्षा
ड) संस्कृतीसमीक्षा

**30)** 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' कोणत्या ठिकाणी आहे?

अ) नांदेड
ब) हैद्राबाद
क) औरंगाबाद
ड) नागपूर

**31)** सर्वात प्रथम द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धान्त कोणी मांडला?

अ) हेगेल
ब) अ‍ॅडम स्मिथ
क) रंके
ड) स्पेंगलर

**32)** स्थळ, काळ, आणि व्यक्ती हे ऐतिहासिक कागदपत्रांचे तीन डोळे आहेत असे कोणी म्हटले आहे?

अ) ग. ह. खरे
ब) वा. सी. बेंद्रे
क) श्री. ना. बनहट्टी
ड) रा. ग. हर्षे

**33)** शिलालेखांचे, संकेतचिन्हांचे, चित्रलिपीचे वाचन करून त्यांचा अर्थ निश्चित करणे ही कोणत्या पद्धतीची संपादन प्रक्रिया आहे?

अ) चिन्हवाचन
ब) संकेत वाचन
क) लिपिवाचन व त्याचा अर्थनिर्णय
ड) यापैकी नाही

**34)** 'साहित्याचा इतिहास म्हणजे मानवी जाणिवांचा इतिहास' हे मत खालीलपैकी कोणत्या तत्ववेत्याचे आहे?

अ) तेन    ब) मार्क्स

क) रुसो    ड) यापैकी नाही

**35)** कथा–कादंबरी इत्यादी साहित्य, चरित्र–आत्मचरित्र ही कोणत्या पद्धतीची साधन सामुग्री आहे?

अ) सांस्कृतिक    ब) कथनात्मक

क) क्षेत्रीय    ड) यौपकी नाही

**36)** 'स्त्री–पुरुषांना समान हक्क आणि विकासाच्या समान संधी प्राप्त झाल्या तर स्त्री–पुरुष विषमता नष्ट होईल' ही कोणत्या प्रकारची विचारसरणी आहे?

अ) मार्क्सवादी स्त्रीवाद    ब) कृष्णवर्णीय स्त्रीवाद

क) अमेरिकन स्त्रीवाद    ड) मवाळ स्त्रीवाद

**37)** 'साहित्य आणि समाजजीवन' हा मार्क्सवादी समीक्षेचा बीज ग्रंथ कोणी लिहिला?

अ) दि. के. बेडेकर    ब) वी. स. जोग

क) लालजी पेंडसे    ड) शरदचंद्र मुक्तिबोध

**38)** कोणत्या पाश्चात्य समीक्षकाने साहित्य समीक्षेला सामाजव्यवहारात मध्यवर्ती स्थान दिले?

अ) मॅथ्यु अरनोल्ड    ब) कोलरीज

क) ॲरीस्टॉटल    ड) कांट

39) 'वाङ्‌यीन महात्मता' हा वा. सी. मर्ढेकरांचा दीर्घ निबंध कोणत्या मासिकाच्या अंकातून प्रसिद्ध झाला आहे?

अ) अभिरुची
ब) तत्रैव
क) कवितारती
ड) सह्याद्री

40) 'रसचर्चेची अडगळ' हा शब्दप्रयोग मराठी समीक्षेत कोणी केला आहे?

अ) रा. श्री. जोग
ब) गंगाधर गाडगीळ
क) दि. के. बेडेकर
ड) के. ना. वाटवे

41) कलामिमांसातील आशय आणि अभिव्यक्तीचा विचार करणारी 'लोकधाटी' व 'मातावळ' ही पुस्तके खालीलपैकी कोणत्या समीक्षकांना लिहिली आहेत?

अ) द. ग. गोडसे
ब) कुसुमावती देशपांडे
क) रा. चिं. ढेरे
ड) प्रभाकर मांडे

42) 'झपूर्झा' : केशवसुत तसे 'पुष्कळा' : ..............?

अ) बा. भ. बोरकर
ब) मंगेश पाडगावकर
क) कुसुमाग्रज
ड) पु. शि. रेगे

43) 'विरानी' हा काव्यप्रकार कोणत्या कवीने प्रथमतः लिहिलेला दिसतो?

अ) ज्ञानेश्वर
ब) तुकाराम
क) जनाबाई
ड) सूरदास

44) 'मराठी कथा रूप आणि परिसर' या ग्रंथात लघुकथेची रुपावैशिष्ट्ये कोणी सांगितली आहेत?

अ) सुधा जोशी
ब) उषा हस्तक
क) म. द. हातकणंगलेकर
ड) रा. गो. चवरे

45) 'स्मरणभक्ती' ही कोणत्या संप्रदायातील ग्रंथकारांची प्रेरणा दिसते?

अ) महानुभाव
ब) वारकरी
क) समर्थ
ड) आनंद संप्रदाय

46) कोणत्या महानुभाव साधिकेला लीळाचरित्र मुखोद्‌गत होते?

अ) रुपाई
ब) नागांबिका
क) महादंबा
ड) हिराईसा

47) 'ना राजे होः अमुचेया कविकुळा बोलू लागैल' असे यादव राजाला उत्तर कोणी दिले?

अ) रावळोव्यास
ब) नरेंद्र
क) साल
ड) नृसिंह

48) 'रामदासवर्णन' हे काव्य खालीलपैकी कोणत्या कवीने लिहिले आहे?

अ) रघुनाथ पंडित
ब) वेणाबाई
क) मुक्तेश्वर
ड) महिपतीबोवा ताहाराबादकर

49) 'महिकावतीची बखर' प्रथमतः कोणी प्रसिद्ध केली?

अ) रियासतकार सरदेसाई
ब) प्रोफेसर मिराशी
क) वि. का. राजवाडे
ड) जयसिंगराव पवार

50) 'तुकोबाच्या मानदंडाने १९ व्या शतकाच्या मध्यापासून २० व्या शतकाच्या शेवटापर्यंत मराठी वाङ्मयाचे यशापयश मापण्याची आवश्यकता' कोणत्या समीक्षकाने व्यक्त केली आहे?

अ) अरुण कोल्हटकर
ब) भालचंद्र नेमाडे
क) दिलीप चित्रे
ड) विलास सारंग

⌘⌘⌘

**Rough Work**

**Rough Work**